सोबत.महाराष्ट्र शासन विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाच्या विमुक्त जाती भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग मधील उन्नत व प्रगत व्यक्ती/गट या करीता नॉन क्रिमीलेयर साठी असलेली उत्पन्न मर्यादा वाढविणे या विषयाबाबतची शासन निर्णयाची प्रत जोडलली आहे.

---

पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/२०१७/ 2944
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 26 DEC 2017

सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :-

१) प्राचार्य, सर्व संस्था अमरावती विभाग अमरावती यांना कळविण्यात येते की, सोबतच्या शासन निर्णयान्वये आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग मधील उन्नत व प्रगत व्यक्ती/गट या करिता नॉन क्रिमीलेयर साठी असलेली उत्पन्न मर्यादा वाढविणे बाबत.

# महाराष्ट्र शासन

विजाभज इमाव व विमाप्र कल्याण विभाग

**शासन निर्णय क्रमांक : सीबीसी-१०/२००८/प्र.क्र.६९७/विजाभज-१**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४४०००३२
दिनांक: १६ डिसेंबर २०१७

वाचा :-

१) शासन निर्णय क्रमांक : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: सीबीसी-१०/२००८/प्र.क्र.६९७/मावक -५दि.१३त जानेवारी,२००९

२) शासन निर्णय क्रमांक: सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग, क्रंमाक :सी.बी.सी-१०/२००८/प्र.क्र.६९७/मावक-५ दि.५दि.२४जून,२०१३

३) शासन निर्णय क्रमांक: मिनीस्ट्री ऑफ पर्सोनल, पब्लिक ग्रीव्हन्सेस अँड पेंन्शस,डिपार्टमेंन्ट ऑफ पर्सोनेल अॅन्ड ट्रेनिंग भारत सरकार यांचे ऑफिस मेमोरेन्डम क्रंमाक ३६.३३/१/२०१३ इएसटी (आरईस), दिनांक१३/९/२०१७

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, जमाती ,निरधि सूचित जमाती, (वि. जा) भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्या साठी आरक्षण अधिनियम २००१(सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) अन्वये महाराष्ट्र राज्यातील विमुक्त जाती,भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग मधिल उन्नत व प्रगत व्यक्ती/गट वगळून आरक्षणाचे फायदे लागू करण्यात आलेले आहेत.उच्च व उन्नत व्यक्ती/गटासाठी राज्य शासनाने उपरोक्त वाचा येथील क्रमांक १ येथील शासन निर्णय दिनांक १३ जानेवारी,२००९ अन्वये कौटुंबिक उत्पन्न मर्यादा, केंद्रशासनाच्या धर्तीवर रु.४.५० एवढी करण्यात आली होती. तसेच सदर शासन निर्णयान्वये केंद्र शासना कडून या पुढे ज्या-ज्या वेळी उत्पन्न मर्यादेत वाढ केली जाईल तीच उत्पन्न मर्यादा यापुढे महाराष्ट्र राज्यातील आरक्षण सोई सवलती करिता उन्नत व प्रगत गट/व्यक्ती करिता लागू राहील असा निर्णय घेण्यात आला आहे. या अनुंषगाने केंद्र शासनाने केलेल्या उत्पन्न मर्यादत केलेल्या वाढीच्या अनुषंगाने उपरोक्त वाचा येथील क्रंमाक २ शासन निर्णयान्वये सदर उत्पन्न मर्यादा रुपये ४.५० लाख वरुन रुपये ६.०० एवढी वाढ केलेली आहे. आता केंद्रशासनाने त्याच्या उपरोक्त वाचा येथील क्रंमाक ३ येथील ऑफीस मेमोरेन्डम अन्वये ६.०० लाख उत्पन्न मर्यादेत वाढ करुन सदर उत्पन्न मर्यादा रुपये ८.००लाख इतकी केली आहे. सदर उत्पन्न मर्यादेत केलेली वाढ राज्यातील विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग,इतर मागासवर्ग या मधील उन्नत व प्रगत व्यक्ती/ गट वगळून आरक्षणाचे फायदे देण्यासाठी लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती...

शासन निर्णय :-

राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती,विशेष मागासप्रवर्ग या मधील उन्नत व प्रगत व्यक्ती/गट या करिता नॉनक्रिमीलेयरसाठी असलेली उत्पन्न मर्यादाही रु ६.०० लक्ष वरुन रुपये ८.००लक्ष इतकी वाढ करण्यास या द्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे. ज्याचे उत्पन्न मागील सलग तीन आर्थिक वर्षामध्ये प्रत्येक वर्षी रुपये ८.०० लाखापेक्षा जास्त आहे. अशाना आरक्षणाचा लाभ मिळणार नाही .

२) तसेच केंद्र शासनाने इतर मागास प्रवर्गामधील उन्नत व प्रगत व्यक्ती/गट वगळून आरक्षणाचे फायदे देण्यासाठी दिनांक १३/०९/२०१७ ऑफीस मेमोरन्डम नुसार उत्पन्न मर्यादेत वाढ करुन ती रुपये ८.००लाख वार्षिक करण्यात आलेली आहे.( सदर ऑफीस मेमोरन्डमची प्रत केंद्र शासनाच्या मिनिस्ट्रीऑफ मिनिस्ट्री ऑफ पर्सोनेल पब्लिक ग्रीव्हन्सेस अँड पेन्शस, डिपार्टमेन्ट ऑफ पर्सोनल अॅन्ड ट्रेनिंग भारत सरकार च्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे).केंद्र शासनाने अखत्यारीतील आरक्षण व सेवा विषयक लाभासाठी केंद्र शासनाने महाराष्ट्राशी संबधित जी इतर मागासवर्गीयांची यादी निशिचीत केलेली आहे त्यांना रु.८.०० लाख एवढी वार्षिक उत्पन्न मर्यादा लागू राहील.

३) सदर आदेश दिनांक १ सप्टेंबर, २०१७ पासून अमंलात राहतील.

४) सदर शासन निर्णय वित्त विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक:१९३/२०१७/ व्यय-१४,दि ३०/११/२०१७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१७१२१६१५१०४२५०२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao Raghunath Gavit

(भा. र. गावित)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा.मंत्री, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
४. मा.राज्यमंत्री, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई

६. मा. प्रधान सचिव, महसूल व वन/वित्त/ नियाजोन/ग्रामविकास/ गृह निर्माण/उघोग,उर्जा व कामगार/उच्च व तंत्रशिक्षण/वैघकीशिक्षण व औषधी द्रव्ये/कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
७. मा.सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
८. महासंचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई(प्रसिध्दीसाठी)
९. संचालक विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. सर्व मंत्रालयीन विभाग
११. सर्व विभागीय आयुक्त
१२. सर्व जिल्हाधिकारी
१३. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१४. व्यवस्थापकीय संचालक, वंसतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, मुंबई
१५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ, मुंबई
१६. सर्व उपविभागीय अधिकारी
१७. सर्व तहसिलदार
१८. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई
१९. संचालक, उच्च शिक्षण, पुणे
२०. संचालक, वैघकिय शिक्षण व संशोधन, मुंबई
२१. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग
२२. सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग
२३. सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
२४. सर्व अध्यक्ष, विभागीय जात प्रमाणप्रत्र पडताळणी समिती
२५. सर्व कार्यासन अधिकरी, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय,मुंबई